## दिनविशेष

### 8 फेब्रुवारी

- ◆१७१४: छत्रपती शाहू महाराज (सातारा गादी) आणि सरखेल कान्होजी आंग्रे यांच्यात वळवंड (लोणावळा) येथे तह झाला.
- ◆१८४९: रोमन प्रजासत्ताकची रचना करण्यात आली.
- ◆१८९९: रँडचा खून करण्र्याया चाफेकर बंधूंची नावे इंग्रज सरकारला सांगणाऱ्या गणेश शंकर द्रविड व रामचंद्र शंकर द्रविड या बंधूंचा वासुदेव चाफेकर आणि महादेव रानडे यांनी गोळ्या झाडून वध केला.
- ◆१९३१: महादेव विठ्ठल काळेयांनी आत्मोद्धार नावाचे पाक्षिक सुरू केले.
- ◆१९३६: १६ सप्टेंबर १९३५ रोजी नोंदणी झालेल्या बँक ऑफ महाराष्ट्र चे कामकाज सुरू झाले.
- ◆१९४२: दुसरे महायुद्ध झ्र जपानने सिंगापूर ताब्यात घेतले.
- ◆१९६०: पंजाबच्या खडकसिंह या मल्लाविरुद्ध गुणांवर विजय मिळवून गणपत आंदळकर हिंदकेसरी बनले.
- ◆१९७१: ठअरउभ्रद हा अमेरिकन शेअर बाजाराचा निदेशांक सुरू झाला.
- ◆१९९४: भारतीय गोलंदाज कपिलदेव निखंज यांनी ४३२ बळींचा जागतिक विक्रम केला.
- ◆ २०००: छत्रपती शिवाजी महाराज जयंती १९ फेब्रुवारीस करण्याचा महाराष्ट्र शासनाचा निर्णय.
- ◆२०१५: नीती आयोगाची पहिली बैठक
- ◆१६७७: फ्रेन्च खगोलशास्त्रज्ञ जॅक्स कॅसिनी यांचा जन्म. (मृत्यू: १६ एप्रिल १७५६)
- ◆१७००: डच गणितज्ञ डॅनियल बर्नोली यांचा जन्म. (मृत्यू: १७ मार्च १७८२)
- ◆१८२८: फ्रेन्च लेखक ज्यूल्स वर्न यांचा जन्म. (मृत्यू: २४ मार्च १९०५)
- ◆१८३४: रशियन रसायनशास्त्रज्ञ दिमित्री मेंदेलिएव्ह यांचा जन्म. (मृत्यू: २ फेब्रुवारी १९०७)
- ◆१८४४: भाषांतरकार गोविंद शंकरशास्त्री बापट यांचा जन्म.
- ◆१९२५: शास्त्रीय गायिका शोभा गुर्टू यांचा जन्म. (मृत्यू: २७ सप्टेंबर २००४)
- ◆१९६३: भारतीय क्रिकेटपटू मोहम्मद अजहरुद्दीन यांचा जन्म.

## पनीर-पुदिना कटलेट

**साहित्य :** २५० ग्राम ताजं पनीर, १/२ कप शिंगाड्याचे पीठ, २-३ हिरव्या मिरच्या, १/२ चमचा वाळवलेली पुदिन्याची पूड, १/२ चमचा लिंबाचा रस, बारीक चिरलेली कोथिंबीर, उपवासाचे मीठ चवीप्रमाणे.

**कृती :** पनीर कटलेट्स करण्यासाठी सर्वप्रथम पनीरला किसून घ्या. हिरव्या मिरच्यांना बारीक चिरून शिंगाड्याच्या पिठात पनीर आणि मिरच्या घाला. आता उरलेले साहित्य वाळवलेली पुदिन्याची पूड, लिंबाचा रस, मीठ, बारीक चिरलेली कोथिंबीर टाकून त्याला मिक्स करून हवे त्या आकाराचे कटलेट करा. तवा गरम करून त्यावर थोडे तूप किंवा शेंगदाण्याचे तेल टाकून दोन्हीकडून कुरकुरीत खमंग शॅलो फ्राय करून घ्या. तयार कटलेट्सला दही किंवा हिरव्या चटणीसोबत सर्व्ह करा.



## आपल्या स्वयंपाकघरातच आहेत सौंदर्यप्रसाधने



तुमच्या केसांपासून ते पायांच्या नखांपर्यंत सर्व गोष्टींची निगा राखण्यास मदत करण्यासाठी विविध तऱ्हेची सौंदर्यप्रसाधने बाजारामध्ये उपलब्ध आहेत. पण या सर्व प्रसाधनांमध्ये अगदी कमी प्रमाणात का होईना, पण रसायने असतातच. त्यामुळे क्वचितप्रसंगी या सौंदर्यप्रसाधनांमुळे ॲलर्जीदेखील उद्भवू शकते. हा धोका टाळायचा असेल, तर घरी तयार केलेली, नैसर्गिक पदार्थ असलेली प्रसाधने वापरणे कधीपण अधिक सोयीस्कर आणि फायद्याचे असते. घरी प्रसाधने तयार करण्यासाठी थोडाफार वेळ खर्ची घालावा लागत असला, तरी त्यापासून आपल्या त्वचेला किंवा केसांना मिळणारे फायदे पाहता, घरी प्रसाधने तयार करण्यासाठी थोडा वेळ जरूर द्यावा.





**साखर :** थंडीमध्ये किंवा उन्हाळ्यामध्ये ओठ कोरडे पडून खरखरीत होतात. याचा उपाय आपल्या स्वयंपाकघरामध्ये अगदी सहज उपलब्ध आहे, तो म्हणजे साखर. साखरेमुळे त्वचेवरील मृत पेशी हटवल्या जाऊन, त्वचेमध्ये कोलाजेनचे प्रमाण वाढते. याकरिता एक टीस्पून खोबरेल तेलामध्ये एक लहान चमचा मध मिसळावा. या मिश्रणात दोन मोठे चमचे साखर घालून, मग थोडासा लिंबाचा रस घालावा आणि हे मिश्रण व्यवस्थित एकत्र करावे. ही तयार झालेली पेस्ट ओठांवर हळुवार गोलाकार चोळावी. दहा मिनिटे ही पेस्ट ओठांवर राहू देऊन, त्यानंतर पाण्याने धुवून टाकावी. ओठ टॉवेलने हळुवार कोरडे करून व्हॅसलिन लावावे. या उपायाने ओठ नेहमी मृदू राहतील.

**ऑलिव्ह ऑईल :** नैसर्गिक मेकअप रिमूव्हर म्हणून ऑलिव्ह ऑईलचा वापर करावा. मेकअपसाठी वापरण्यात येणाऱ्या सौंदर्यप्रसाधनांमध्ये थोड्या प्रमाणात ॲस्ट्रिंजंट असते, ज्यामुळे आपली त्वचा कोरडी पडू लागते. मेकअप उतरवण्याकरिता ऑलिव्ह ऑईल वापरल्याने मेकअप संपूर्णपणे साफ होतोच, पण त्याशिवाय त्वचेचा कोरडेपणा दूर होऊन, त्वचेला आर्द्रता मिळते.

**टोमॅटो :** त्वचेची निगा राखण्याकरिता प्रत्येक वेळी ब्युटी पार्लरकडे धाव न घेता, घरच्या घरीच उत्तम फेस मास्क तयार करावा. नितळ, सुंदर त्वचेकरिता टोमॅटो अतिशय चांगला पर्याय आहे. टोमॅटोमधील 'अ' जीवनसत्त्व त्वचेवरील डाग हलके करण्यास सहाय्यक आहे. तसेच यामध्ये मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असल्याने त्वचेचा पोत सुधारून, त्वचा चमकदार बनते. हा मास्क बनवण्याकरिता एका टोमॅटोची पेस्ट चेहऱ्यावर लावून वीस मिनिटे राहू द्यावी. त्यानंतर चेहरा थंड पाण्याने धुवावा. या उपायाने त्वचा त्वरित उजळते.



**नारळ :** नारळाच्या दुधामध्ये 'ई' जीवनसत्त्व व केसांना पोषक नैसर्गिक तेले मुबलक मात्रेमध्ये असतात. ॲवोकाडोमध्ये केसांच्या पोषणासाठी आवश्यक प्रथिने व केसाच्या मुळांना पोषक तत्त्वे असतात. नारळाचे दूध व ॲवोकाडो वापरून तयार केलेला मास्क केसांसाठी वापरला असता, केस चमकदार आणि मुलायम बनतात. हा मास्क तयार करण्यासाठी ॲवोकाडो आणि नारळाचे दूध एकत्र करून त्यांची पेस्ट तयार करावी. ही पेस्ट केसांच्या मुळांपासून टोकांपर्यंत व्यवस्थित लावून घ्यावी. अर्धा तास ही पेस्ट केसांवर राहू देऊन त्यानंतर केस धुवावेत. या हेअर मास्कमुळे केसांच्या मुळांना ताकद मिळून, केसांची वाढ चांगली होते.



**मध आणि बदामाची पूड :** हात कोरडे पडून रखरखीत होत असल्यास त्यासाठी मास्क घरच्या घरी तयार करता येतो. एक लहान चमचा मधात थोडा लिंबाचा रस घालावा. त्या मिश्रणामध्ये एक मोठा चमचा बदामाची पूड व एक लहान चमचा अक्रोडची पूड घालावी. अक्रोडची पूड नसल्यास एक चमचा सूर्यफुलाचे तेल घालावे व हे मिश्रण हाताना चोळावे. पाच मिनिटांनी हात गार पाण्याने स्वच्छ धुवून टाकावेत. या उपायाने हात मुलायम राहतील.

## भविष्य

**मेष :** महत्त्वाचा निर्णय घेता येईल. डावपेच यशस्वी होईल. स्पर्धेत जिंकाल. वाहन हळू चालवा. वैर करण्यात फायदा नसतो. परिस्थिती समजावून घ्या.

**वृषभ :** मनाप्रमाणे काम करून घेता येईल. वरिष्ठांना राजी करण्यासाठी थोडा वेळ लागेल. आर्थिक उलाढाल शक्य होईल. मोठ्या लोकांचा परिचय होईल. अडचणी कमी होतील.

**मिथुन :** घरगुती कामे करून घेण्यात यश मिळेल. नोकरीत वरिष्ठ खूश होतील. आशादायक परिस्थिती तयार होईल. तणाव कमी झाल्याने समस्या सोडवण्याचा मार्ग मिळेल.

**कर्क :** आजचे काम आजच करा. रागावर ताबा ठेवा. संयम बाळगा. तुमच्या सामाजिक कार्यात यश मिळेल. शत्रूला कमी न लेखता तुमचे हित साधावे लागेल.

**सिंह :** धंद्याला तेजी येईल. व्यवसायाचा जम बसवण्यासाठी इतरांची मदत घेता येईल. घरातील समस्या सोडवता येईल. वाटाघाटीत यशस्वी व्हाल. स्पर्धेत जिंकाल.

**कन्या :** मनची चंचलता होईल. आपले मत व्यक्त करण्यासाठी योग्य व्यक्तींची निवड करता येईल. धंद्यात नवे काम मिळेल. शेजारी त्रस्त करण्याची शक्यता आहे.

**तुळा :** तुमचे मत इतरांवर लादता येणार नाही. हट्टीपणाने वागून गैरसमज होऊ शकतो. वाहन जपून चालवा. तुमच्या योजनेला वेग प्राप्त होईल. धंद्यात जम बसेल.

**वृश्चिक :** डावपेच यशस्वी होतील. ज्येष्ठ व्यक्तीची संकटात मदत होईल. धंद्यातील अंदाज बरोबर येईल. फायदा घ्या. क्षुल्लक वाद वाढवत राहू नका. प्रवासात नवीन ओळख होईल.

**धनु :** अतिरेक केल्यास जुळत आलेले काम फिसकटू शकते. लोक तुम्हाला मानाची वागणूक देतील. तुमच्या विचारांना चालना मिळेल. धंद्यात नवा फंडा उपयोगी पडेल.

**मकर :** अडचणीवर मात करता येईल. जिद्द ठेवा. कुणालाही दुखवू नका. प्रेमाच्या बोलण्याला फसू नका. रागाचा पारा वाढवू नका. तुमच्या फायद्याचा विचार कोण करतो याकडे लक्ष देता येईल.

**कुंभ :** आप्तेष्ठांच्या भेटीगाठीत यश मिळेल. प्रवासात दगदग होईल. धंद्यात सुधारणा करता येईल. नवे क्षेत्र मिळेल. धंद्यात मोठी वाढ होईल. नवे काम मिळेल. नोकरीत बढती होईल.

**मीन :** रेंगाळलेले काम मार्गी लावता येईल. अधिकारी वर्गाशी ओळख होईल. धंद्यात वाढ करता येईल. क्षुल्लक कारणाने डोके भडकण्याची शक्यता आहे. प्रवासात सावध रहा.

## अनेक गुणांचा खजिना आहे हे इवलेसे बोर...

बोर हे लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वांनाच आवडते. चवीला आंबट, गोड, तुरट असणारे हे फळ स्वतःमध्ये अनेक गुणांचा साठा घेऊन आहे. चला तर मग आपण याचे गुण जाणून घेऊ या.. बोराचे गुण आरोग्य लाभ देण्याचे आहे. यात भरपूर प्रमाणात पोषक आणि खनिजे असतात. गंभीर किंवा सामान्य रोगांशी लढण्यात ते सक्षम असते. यात सोडियम, कोलेस्टेरॉलचे प्रमाण कमी असून पोटॅशियम आणि व्हिटॅमिन सी असते. बोर फळाचे गुण पुढील प्रमाणे आहे....



**वजन कमी करण्यात लाभकारी :** ज्यांना वजन कमी करावयाचे आहे त्याने बोराचे सेवन करावे. यात कोलेस्टेरॉल कमी असते आणि फायबर, प्रथिने चांगल्या प्रमाणात असतात. जे आपल्याला ऊर्जा देतात. फायबर आणि पोषक तत्त्व भुकेवर नियंत्रण ठेवतात. त्यामुळे आपलं वजनावर पूर्णपणे नियंत्रित राहतं. त्याचबरोबर आपण ऊर्जावान राहतो.

**हृदयासाठी लाभकारी :** बोरांमध्ये पोटॅशियम भरपूर असतं आणि सोडियम कमी असतं. यामुळे रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत होते. याने रक्तवाहिन्यांना पुरेशी विश्रांती मिळाल्याने हे हृदयाला संरक्षण देतं. यात एंटीथ्रोजेनिक गुण असतो जो धमन्यांतील चरबीला जमू देत नाही. त्यामुळे हृदय सुरक्षित राहतं.

**रक्तदाबाला नियंत्रित करतं :** शरीरात योग्य रक्ताभिसरण झाल्याने प्राणवायू (ऑक्सिजन) चा पुरवठा पुरवला जातो. त्यामुळे शरीरात ऊर्जा प्रवाह वाढतो. यामध्ये लोह आणि फॉस्फरस चांगल्या प्रमाणात असतात जे लाल रक्त पेशींना तयार करतात. बोर आपल्यातील रक्ताभिसरणात सुधारणा करून रक्तदाबाला नियंत्रित करतं. अशा प्रकारे, बोराचे फायदे रक्तदाब आणि हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी आरोग्यासाठी आहेत.

**रोगप्रतिकारक शक्ती वाढवते :** बोरांमध्ये व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी आणि खनिज घटक असतात. हे सर्व घटक शरीरात अँटीऑक्सिडेन्ट म्हणून कार्य करतात. यामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास मदत मिळते. हे घटक मुक्त रॅडिकल्स पासून होणारे आजार जसे-कर्करोग, हृदयरोग, सामान्य आजारांपासून शरीराच्या होणाऱ्या नुकसानापासून रक्षण करतं. कुठल्याही ॲलर्जीसाठी बोर लाभकारी आहे.

**तणावातून मुक्ती :** बोराचे सेवन नियमित केल्याने ताण-तणावांपासून दूर राहण्यास मदत होते तसेच नैराश्य आणि इतर मानसिक समस्येतून मुक्ती मिळून मन शांत आणि स्थिर राहतं.

**पचनसंस्थेसाठी लाभकारी :** अपचन, गॅस, बद्धकोष्ठतासारख्या व्याधींपासून ग्रस्त असणाऱ्यांसाठी बोर फळ एक चांगला पर्याय आहे. यात फायबरची मात्रा चांगली असल्याने यात असलेले सॅपोनिन आणि ट्राइटरपीनोइड घटक अन्नातून पुरेसे पौष्टिक द्रव्य शोषतात. याने पचनशक्ती वाढवण्यास मदत मिळते. याचे नियमित सेवन केल्याने बद्धकोष्ठता, अपचन, गॅस पोट फुगणे यासारख्या समस्यांतून मुक्ती मिळते.

**केस वाढीसाठी लाभकारी :** केसांना सुंदर आणि निरोगी बनवण्यासाठी बोराचे नियमित सेवन केले पाहिजे. केसांसाठी बोर तेलाच्या वापर नियमित केल्याने केसांची वाढ होते आणि केस निरोगी राहतात.

**निद्रानाशासाठी लाभकारी :** ज्यांना निद्रानाशेचा त्रास आहे त्यांच्यासाठी हे लाभकारी आहे. बोर फळे आणि त्याच्या बियांमध्ये सॅपोनिन्स आणि पॉलिसेकेराइड्स सारख्या फ्लेव्होनॉइड्सचे प्रमाण चांगले असते. सॅपोनिन्स झोपेची गुणवत्ता वाढवण्यात मदत करतात. बोराचे गुणधर्म संपूर्ण मज्जासंस्थेवर चांगला प्रभाव टाकतात ज्यामुळे चांगली झोप येते.

**त्वचेसाठी लाभकारी :** बोर फळात ॲण्टीऑक्सिडेंट आणि अँटी-इंफ्लामेटरी गुण असतात. या गुणधर्मामुळे त्वचेवरील सुरकुत्या, मुरुम, डोळ्याखालील काळे मंडळ या समस्या दूर होतात. खरूजपासून पण संरक्षण होते.

## रोहित ऐवजी हार्दिक 'मुंबई' चा कर्णधार का?

रोहित ऐवजी हार्दिक 'मुंबई'चा कर्णधार का? अखेर कारण आलं समोर IPLच्या आगामी हंगामात मुंबई इंडियन्सचा संघ हार्दिक पंड्याच्या नेतृत्वाखाली खेळणार आहे. रोहित शर्माच्या जागी त्याच्याकडे नेतृत्व सोपवण्यात आलं आहे. रोहितला कर्णधारपदावरून हटवल्यानंतर बराच वाद झाला होता. आता बऱ्याच काळानंतर संघाचे मुख्य प्रशिक्षक मार्क बाउचर यांनी या प्रकरणावर उघडपणे भाष्य केलं आहे.





## उर्वरित सामन्यांसाठी आज भारतीय संघाची घोषणा! विराटच्या पुनरागमनावर द्रविड म्हणाले...,



भारताने इंग्लंडविरुद्धचा दुसरा कसोटी सामना जिंकत 5 सामन्यांच्या कसोटी मालिकेत बरोबरी साधली आहे. आता मालिकेतील तिसरा कसोटी सामना राजकोटमध्ये 15 ते 19 फेब्रुवारी दरम्यान खेळवला जाणार आहे. मात्र त्याआधी उर्वरीत कसोटी सामन्यांसाठी आज भारतीय संघाची घोषणा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता उर्वरित सामन्यांसाठी विराट कोहली पुनरागमन करणार का? असा प्रश्न त्याच्या चाहत्यांना पडला आहे. अशातच आता प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी विराट कोहली खेळणार की नाही यासंदर्भात माहिती दिली आहे. विराट कोहली पुनरागमन करणार की नाही, यासंदर्भात माहिती देताना राहुल द्रविड म्हणाले की, ह्मला वाटते की यासंदर्भात निवडकर्त्यांना विचारणे योग्य ठरेल. पण मला खात्री आहे की ते पुढील तीन कसोटींसाठी संघ निवडण्यापूर्वी उत्तर देण्यास तयार असतील. आम्ही त्यांच्याशी विराटबद्दल चर्चा करू. मला खात्री आहे की पुढील काही दिवसात संघाची निवड होईल. त्यामुळे बीसीसीआयचे निवडकर्ते अंतिम तीन सामन्यांसाठी संघ जाहीर करण्यापूर्वी विराट कोहलीशी चर्चा करण्याची शक्यता आहे. माध्यमातील वृत्तानुसार, इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात भारतासाठी अर्धशतक झळकावणारा केएल राहुल दुखापतीमुळे दुसऱ्या कसोटी सामन्यात खेळू शकला नाही. मात्र आता तो पुढील तीन कसोटी सामन्यांसाठी पुनरागमन करण्याची शक्यता आहे. याशिवाय विश्रांती घेतलेल्या मोहम्मद सिराजलाही निवड समिती संघात संधी देऊ शकते. तसेच केएस भरतच्या सततच्या खराब कामगिरीमुळे मुख्य निवडकर्ता अजित आगरकर इशान किशनला यष्टिरक्षक फलंदाज म्हणून संधी देऊ शकतो, असा दावाही करण्यात येत आहे.



## जेव्हा प्रियांकाच्या घरी पडली होती रेड... अनेक वर्षांनी सत्य समोर



प्रियांका चोप्रा ही अभिनेत्री, गायिका आणि चित्रपट निमार्ता आहे. प्रियांकाने आपल्या करिअरची सुरुवात मॉडेल म्हणून केली. २००० मध्ये तिने मिस वर्ल्ड या स्पर्धेमध्ये विजेतेपद पटकावले होते. देसीगर्ल प्रियांका चोप्रा आता ग्लोबल आयकॉन झाली आहे. परदेशातही प्रियंकाने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. अमेरिकन गायक निक जोनाससोबत प्रियांकाने लग्न केल्यापासून ती न्युयॉर्कमध्येच स्थायिक झाली आहे. मात्र ग्लोबल स्टार होण्याचा तिचा प्रवास सोपा नव्हता. तिला त्यासाठी खूप संघर्ष करावा लागला. प्रियांका चोप्राच्या घरावर छापा 2011 मध्ये आयकर विभागाने प्रियांका चोप्राच्या घरावर छापा टाकला होता. त्यावेळी शाहिद कपूरनेच आयटी अधिकाऱ्यांसाठी प्रियांकाच्या घराचा दरवाजा उघडला होता. ही बातमी सर्वत्र पसरली होती. कमीने सिनेमात प्रियंका आणि शाहिद एकत्र दिसले होते, ज्यानंतर दोघांच्या अफेरच्या अफवा उडल्या होत्या. आयकर विभागाच्या छाप्याबाबत केला खुलासा प्रियांका चोप्राने आप की अदालत या शो मध्ये याबाबत खुलासा केला होता. छापा पडला हे सांगायला मला लाज वाटत नाही. आयकर विभाग हा अतिशय जबाबदार विभाग आहे. जर ही बातमी बाहेर आली आहे तर ती खरी आहे. यानंतर रजत शर्मा घराचा दरवाजा कोणी उघडला असे विचारतात. ज्यावर प्रियांका म्हणते, सामान्यतः जो आम्हाला आमच्या घरात मदत करतो तो दरवाजा उघडतो. माझ्या घरी काम करणाऱ्या मेडचं नाव रंजीता आहे. ज्यावर रजत कपूर म्हणाले, तुमच्या मेडचा चेहरा शाहिद कपूरसारखा आहे. ज्यावर अभिनेत्री म्हणते, मला एक वाटते की ज्या वृत्तपत्रात याबद्दल लिहिले आहे ते आयकर विभागासह माझ्या घरी आले असावे. दरवाजा कोणी उघडला हे त्यांनी पाहिले असेल. तुमच्याकडे ना पुरावा आहे आणि ना असे कधी घडले आहे. तुम्ही काही बिनबुडाच्या अफवांवर पहिल्या पानावर बातम्या बनवता, तुम्ही एका मुलीबद्दल बोलत आहात जी तिच्या पालकांसोबत राहते हे पूर्णपणे विसरून जातो. मी सुद्धा कोणाची तरी मुलगी आहे, कोणाची बहीण आहे. यादरम्यान प्रियंका चोप्राने सांगितले होते की, शाहिद कपूर तिच्या घराच्या अगदी जवळ राहतो. त्यावेळी प्रियांकाच्या घरापासून शाहिदचे घर 3 मिनिटांच्या अंतरावर होते. प्रियांकाने सांगितले होते की, तिची मोलकरीण रंजिता हिने आयकर अधिकाऱ्यांसाठी दरवाजा उघडला होता.



## घायाळ करणाऱ्या अदा... सईच्या फोटोवर चाहत्याची कमेंट

मराठी चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनयाची छाप पाडणारी अभिनेत्री सई ताम्हणकर सध्या तिच्या श्रीदेवी प्रसन्न चित्रपटामुळे चर्चेत आहे. सई सोशल मीडियावरही तितकीच सक्रिय असते. सई नेहमी सोशल मीडियावर तिच्या वेगवेगळ्या लूकचे फोटो शेअर करत असते. नुकतच सईने एक फोटोशूट केलं आहे. सईच्या या फोटोवर सईचे चाहते अनेक कमेंट्स करत आहेत. मराठी चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनयाची छाप पाडणारी अभिनेत्री सई ताम्हणकर सध्या तिच्या श्रीदेवी प्रसन्न चित्रपटामुळे चर्चेत आहे. सई सोशल मीडियावरही तितकीच सक्रिय असते. सई नेहमी सोशल मीडियावर तिच्या वेगवेगळ्या लूकचे फोटो शेअर करत असते. नुकतच सईने एक फोटोशूट केलं आहे.

## लोकरक्षणाय सुडोकू - १

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | 7 | 1 |
| 3 | | | | 8 | | | 5 | 9 |
| | | | | 2 | | 8 | | |
| | | 2 | | | | 9 | 1 | |
| | | | 6 | | | | | 3 |
| 7 | | | | 4 | | | | |
| | 4 | | 9 | | | | 3 | 2 |
| | 5 | | | 7 | | | 4 | 8 |
| | 2 | | 3 | | | 6 | | |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 9809386748, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

